Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 09/06/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शक वसंत देसाई

वसंत कृष्णाजी देसाई हे भारतीय कीर्तीचे सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शक होते. त्यांच्या जन्म ९ जून १९१२ रोजी सोनवडे, सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग येथे झाला. त्यांचे वडील कृष्णाजी व आई मुक्ताबाई होते. मुक्ताबाई या आबा भास्कर परुळेकर या प्रसिद्ध कीर्तनकारांच्या कन्या. त्यामुळे लहानपणापासून वसंत यांच्या कानावर भजन, कीर्तन, दशावतारी संगीत आले व त्याची गोडीही लागली. त्यांचे शालेय शिक्षण गावीच झाले. सर्कशीत जावे असे त्यांना लहानपणी वाटत होते, म्हणून ते कोकणातून कोल्हापुरास त्यांचे काका नरहरी यांच्याकडे आले, परंतु सर्कशीत न जाता प्रभात फिल्म कंपनीत गेले. मूकपटांतून किरकोळ भूमिकाही त्यांनी केल्या.

१९३० मध्ये प्रभातच्या खूनी खंजर या मूकपटात त्यांना छोटी भूमिका मिळाली. त्याच सुमारास प्रभात फिल्म कंपनीच्या अयोध्येचा राजा (१९३१) या पहिल्या बोलपटात त्यांनी संगीतदिग्दर्शक गोविंदराव टेंबे यांचे साहाय्यक म्हणून काम केले. तर १९३४ साली प्रभात फिल्म कंपनीचे कोल्हापुराहून पुण्यास स्थलांतर झाल्यावर वसंतरावांनी केशवराव भोळे आणि मा. कृष्णराव फुलंब्रीकर यांच्यासारख्या संगीत-अभ्यासकांबरोबर सहाय्यक म्हणून काम केले. त्यांच्या सहवासात राहून त्यांनी गाण्यातील स्वर, तान, मुरकी इ. संगीत-विशेष संपादन केले. रसानुकूल भावदर्शन आपल्या गाण्यात आणण्याचे कसब दाखविले तसेच स्वतंत्र स्वररचनेचे तंत्रही त्यांनी हाताळले. कोल्हापुरातील वास्तव्यात ते गायन समाज देवल क्लब या संगीत संस्थेत जात असत. तेथे त्यांना शास्त्रीय संगीतातील दिग्गज उस्ताद अलाउद्दीनखाँ, उस्ताद अब्दुलकरीमखाँ, उस्ताद मंजीखाँ आणि रामकृष्णबुवा वझे यांचा सहवास लाभला. हलक्याफुलक्या संगीतापेक्षा रागदारी संगीतामध्ये त्यांना विशेष गोडी असल्यामुळे प्रभात फिल्म कंपनीत असतानाच त्यांनी इनायत खाँसाहेब यांच्याकडे शास्त्रोक्त संगीताची साधना केली. वसंत देसाई यांचे २२ डिसेंबर १९७५ रोजी मुंबई येथे निधन झाले.

Nashik Edition

Jun 09, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

